सरकार वि. शुभम

सं.फौजदारी खटला क्र.२१४३/२०२६

नि.क्र. –

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र. ३, नागपूर.

## (पिठासीन न्यायाधीश एन.बी.पाटील.)

(फौजदारी प्रक्रिया संहितेचे प्रकरण २१ अन्वये संक्षिप्त खटला )

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | २४.०९.२०२५ |
| २. | अपराध किंवा फिर्यादीचा दिनांक | २४.०९.२०२५ |
| ३. | फिर्यादीचे पुर्ण नाव व पत्ता इ. | सरकार तर्फे पोलीस हवालदार विनोद रामभाऊ वडस्कर, ब.क्र. ५३५९, वाहतुक शाखा कामठी, नागपूर शहर |
| ४. | आरोपीचे पुर्ण नाव व पत्ता इ. | शुभम चिरंजीवप्रसाद गुप्ता, वय ३० वर्ष, व्यवसाय – हातमजुरी, राह. भवानी मंदीर, पारडी, नागपूर. |

५. **अपराधाचा तपशीलः** तुम्ही दि. **२४.०९.२०२५** रोजी १२.०० ते १२.१० वा. दरम्यान नागपूर येथील ते चिखली चौककडून भारत नगर चौककडे जाणा–या सार्वजनिक रस्त्यावर विरुध्द बाजुने तुमच्या ताब्यातील होंडा ॲक्टीवा गाडी क्र. एमएच–३७/एक्स/८८६७ भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, मानवी जिवीतास धोकादायकरित्या चालवितांना समक्ष मिळून आल्याने त्यायोगे तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम २८१** अंतर्गत शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे आणि याद्वारे मी असे निर्देश देतो कि, उक्त आरोपाबाबत तुमची न्याय चौकशी करण्यात यावी.

दि. १०/०३/२०२६

स्वा./–
(एन.बी.पाटील)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र. ३ ,नागपूर

वरील अपराधाचा तपशील आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितलास.

दि. १०/०३/२०२६

स्वा./–
(एन.बी.पाटील)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र. ३ ,नागपूर

६. **आरोपीचे बयान**

प्र.क्र. १ तुम्हाला प्रकरणांच्या नकला मिळाल्या का ?

उत्तरः होय.

प्र.क्र. २ तुम्हाला तुमच्यावर लावलेला आरोप आता वाचून व समजावून सांगितला तो समजला का ?

उत्तरः होय.

प्र.क्र. ३ तुम्हाला सरकारतर्फे वकील पाहिजे काय ?

उत्तरः नाही.

प्र.क्र. ४ तुम्हाला गुन्हा कबुल आहे का?

उत्तरः होय.

वरील अपराधाचा तपशील आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला, त्याने स्वईच्छेने गुन्हा कबुल केला.

..................................

आरोपीची सही

स्वा./-

दि. १०/०३/२०२६

(एन.बी.पाटील)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

न्यायालय क्र. ३ ,नागपूर

## न्यायनिर्णय

१. सदर आरोपी विरूध्द प्रस्तुत खटला हा कलम भारतीय न्याय संहिता कलम २८१ अन्वये अपराध केल्याच्या आरोपाकरीता दाखल करण्यात आला आहे.

२. सदर प्रकरणात आरोपीने स्वईच्छेने गुन्हा कबुल केला आहे. सदर गुन्ह्याची कबुली नंतरचे परिणाम या न्यायालयाने त्यास स्वतः समजावून सांगितले, परंतु तो स्वतःहून गुन्हा कबुलीच्या निर्णयास ठाम राहिल्यामुळे त्याची कबुली मान्य करण्यात आली. त्यावरून मी असे निर्णय करीत आहे की, आरोपीने कलम भारतीय न्याय संहिता कलम २८१ अन्वये गुन्हा केला आहे.

३. आरोपीस शिक्षेबद्दल विचारण्यात आले. त्याने सदरचा गुन्हा प्रथम गुन्हा असल्यामुळे त्याला कमी दंड अगर शिक्षा देण्यात यावी अशी विनंती केली. आरोपीचा हा प्रथम गुन्हा असल्यामुळे त्याला विहीत शिक्षेपेक्षा कमी शिक्षा देणे योग्य आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. आरोपीस **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये** कलम **भारतीय न्याय संहिता कलम २८१** अंतर्गत गुन्हा केल्याने **रु. ५००/-** (पाचशे रूपये मात्र) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे व दंड न भरल्यास त्यास दोन दिवसांची साध्या कैदेची शिक्षा देण्यात येत आहे.

PATIL NILESH BHASKAR

Order
Digitally signed by PATIL NILESH BHASKAR
Location: Nagpur
Date: 2026.03.13 11:21:34 +0530

दि.१०/०३/२०२६

(निलेश बी.पाटील)

न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी,

न्या.क्र. ३, नागपूर.